**नियमित दिवाणी दावा क्र.१५५/२०२१**

**( विश्वनाथ ताठे वि. मंडाबाई ताठे व इतर)**

**CNR No. MHSO070001912021**

## <u>निशाणी क्र.३७ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने आदेश २६, नियम ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्ताची नेमणुकीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीने सदरचा दावा ठरावासाठी आणि निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. वादी अर्जात असे कथन करतो की, दावा कलम १अ मधील गट क्र.१९७/२/ब या वादीच्या मिळकतीचे पश्चिम बाजूकडील प्रतिवादीची मिळकत गट क्र.१९७/२/अ च्या दक्षिण बाजूस असणा–या रस्त्याने जा–ये करण्याचा इजमेंट बाय नेसेसिटी व इजमेंट बाय प्रिस्क्रीप्शन चा रस्त्याचा हक्क ठरवून मिळणेसाठी व सदर रस्त्याच्या वापरास हरकत अडथळा करु नये इत्यादी साठी वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. वादीच्या दावा मिळकतीच्या पश्चिमेस प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची मिळकत असून सदर मिळकतीच्या दक्षिणेस भारत ज्ञानोबा सावंत यांच्या मिळकतीलगत पुणे–पंढरपूर रस्ता असून सदर पुणे–पंढरपूर रस्त्याच्या उत्तर अंगास पूर्व पश्चिम चालीचा वाडीकुरोली ते पिराचीकुरोली हा शिवेलगतून जाणारा रस्ता आहे. सदर रस्त्याने पूर्वेकडे वळून पश्चिम पूर्व चालीचे वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीच्या दक्षिण दिशेकडील रस्त्याने वादीच्या मिळकतीत येण्यासाठी पूर्वापार असा रस्ता असून सदर रस्त्याचा वापर वादी व प्रतिवादी व त्या भागातील अन्य खातेदार शेतकरी पूर्वीपासून करत आलेले आहेत. सदर रस्त्याच्या वापरास प्रतिवादी क्र.३ हे हरकत अडथळा करत आहेत. त्यामुळे वादींनी तहसिलदार, पंढरपूर यांच्याकडे रस्ता केस दाखल केला होता. त्याचा निकाल वादीच्या बाजूने झाला आहे.

३.        प्रतिवादी क्र.३ त्यांच्या मिळकतीपाशी असणा–या सदर रस्त्यास पाणी वगैरे सोडून रस्त्याचे नुकसान करुन रस्त्याच्या वापरास अडथळा निर्माण केल्याची परिस्थिती कोर्टापुढे चौकशीच्या वेळी अंतिम न्यायनिर्णयाच्या वेळेस असणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी न्यायालयीन आयुक्तामार्फत होऊन तसा अहवाल सादर करणे गरजेचे आहे. त्यामुळे दावा मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी करण्याकरिता वकिलांची नेमणूक न्यायालयीन आयुक्त म्हणून होऊन मिळावी अशी विनंती वादीने या अर्जाद्वारे केली आहे.

४.        सदर अर्जास प्रतिवादी क्र.३ यांनी म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादी क्र.३ यांचे असे कथन आहे की, वादी स्थळपाहणी करुन पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करत आहे. वादीचा अर्ज खरा व बरोबर नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

५.        वादीने प्रस्तुतचा दावा ठरावाकरिता व निरंतर ताकिद हुकूमाकरिता दाखल केला आहे. त्यांनी दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादीच्या रस्त्याच्या वापरास हरकत अडथळा करु नये अशी विनंती केली आहे. निरंतर मनाई हुकूमाच्या दाव्यामध्ये प्रतिवादींतर्फे वादीच्या रस्त्याच्या वापरास हरकत अडथळा होते ही बाब वादीने पुराव्यानिशी सिध्द करणे गरजेचे आहे. न्यायालयीन आयुक्तांमार्फत स्थळ पाहणी करुन वादी सदर तरतुदीचा वापर पुरावा गोळा करण्यासाठी करत आहे असे दिसून येते. सदरचे प्रकरण पुराव्याकरिता तहकूब आहे. सदर प्रकरणामध्ये नि.क्र.३४ कडे मुद्दे गठीत करण्यात आलेले आहेत. परंतू वादीने पुरावा दाखल न करता न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करण्यात यावी असा अर्ज दाखल केलेला आहे. वादीने सर्वप्रथम त्याचा मौखिक पुरावा दाखल करुन दाव्यातील कथने सिध्द करणे गरजेचे आहे. दावा मिळकतीची परिस्थिती अभिलेखावर आणण्याची सर्वस्वी जबाबदारी वादीची आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब मी

खालील आदेश पारित करत आहे.

**आदेश**

वादीचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

(खुल्या न्यायालयात जाहीर.)

PRIYANKA RAMESH PATIL
Digitally signed by PRIYANKA RAMESH PATIL
Date: 2026.04.24 15:43:44 +0530

( पी.आर.पाटील )

दिनांकः–२४.०४.२०२६　　　　　५वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पंढरपूर.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 5th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 24.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 24.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 24.04.2026 |